## संजीवनच्या रोहित नायकवडी व आकाश खरात यांची महावितरण मध्ये निवड-

पन्हाळा : प्रतिनिधी

पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालया तील ईलेक्ट्रीकल विभागाच्या कु. रोहित उत्तम नायकवडी व आकाश कालिदास खरात यांची महावितरण (MSEDCL) मध्ये ज्युनिअर इंजिनिअर या पदावर निवड झाली. महाराष्ट्र स्टेट ईलेक्ट्रीसीटी डिसट्रीब्युशन कंपनी (महावितरण) यांच्या व्दारे ऑगस्ट २०१८ मध्ये घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा अंतर्गतज्युनिअर इंजिनिअर या पदावर त्यांची नियुक्ती झाली आहे. त्यांना यासाठी ईलेक्ट्रीकल विभागाच्यास्पर्धा परीक्षा केंद्राचा फायदा झाला आहे. ईलेक्ट्रीकल विभागाचे विभागप्रमुख प्रा. पी. पी. कुलकर्णी तसेच विभागाचे सर्व शिक्षक, कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी आणि संजीवन संस्थेचे सहसचिव एन. आर. भोसले व चेअरमन पी. आर. भोसले यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

फोटो - १. रोहित नायकवडी
२. आकाश खरात





रोहित नायकवडी आकाश खरात